RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ११, अंक २५(८)] शुक्रवार, डिसेंबर १२, २०२५/अग्रहायण २१, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक १२०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **१२ डिसेंबर, २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियम ११६ अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. XC OF 2025.**

*A BILL*
*TO PROVIDE UNEMPLOYMENT ALLOWANCE TO THE UNEMPLOYED GRADUATES IN THE STATE OF MAHARASHTRA.*

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९०.**

**महाराष्ट्र राज्यातील पदवीधर बेरोजगारांना प्रति माह बेरोजगार भत्ता देण्याबाबत विधेयक, २०२५.**

ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनाकरिता पदवीधर झाल्याच्या दिनांकापासून ५ वर्षाच्या कालावधीत रोजगार प्राप्त झाला नाही किंवा वयाची २५ वर्षे पूर्ण होईपर्यंत यापैकी जे सर्वप्रथम अमलात येईल तोपर्यंत राज्यातील पदवीधर बेरोजगारांना त्यांच्या किमान गरजा भागविता येणे शक्य व्हावे यासाठी त्यांना दरमहा रुपये ५,०००/- हजार आर्थिक सहाय्य मंजूर करणे इष्ट आहे. याकरिता शासनाने नियमावली ठरवून त्यांना बेरोजगार भत्ता मंजूर करावा. त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :-



भाग पाच-१२०—१.
एचबी २४९८—१.

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र राज्यातील पदवीधर बेरोजगारांना सेवा- सुविधा (बेरोजगार भत्ता) देण्याबाबत अधिनियम, २०२५ असे म्हणावे.

(२) तो ताबडतोब अंमलात येईल.

**२.** या अधिनियमानुसार "बेरोजगार" म्हणजे पदवी परिक्षा वा समकक्ष परिक्षा उत्तीर्ण झालेला तथापि दोन वर्षापर्यंत कायमस्वरुपी रोजगार प्राप्त झाला नाही असा महाराष्ट्र राज्यातील रहिवासी.

बेरोजगारी भत्ता देण्याबाबतचे निकष.

**३.** (१) राज्यातील पदवीधर बेरोजगारांना शासनातर्फे बेरोजगार भत्ता मिळविण्यासाठी खालील अटींची पूर्तता करणे बंधनकारक असेल ;

(अ) पदवीधर बेरोजगार हा महाराष्ट्र राज्याचा कमीत कमी १५ वर्षे रहिवासी असावा, व त्याचे नावे रहिवासी दाखला असावा, आणि

(ब) बेरोजगाराने पदवी वा समकक्ष शिक्षण पूर्ण केलेले असावे अशा बेरोजगारांना या योजनेचा लाभ घेता येईल.

(२) राज्यातील पदवीधर बेरोजगारांना रु. ५,०००/- प्रति माह या दराने बेरोजगार भत्ता देण्यात येईल.

(३) बेरोजगार भत्ता राज्यातील पदवीधर बेरोजगारांना त्याच्या वयाची २५ वर्षे पूर्ण होईपर्यंत यापैकी जे सर्वप्रथम अमलात येईल तोपर्यंत बेरोजगार भत्ता देण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

राज्यात दिवसेंदिवस महाविद्यालयीन शिक्षणाच्या प्रमाणात वाढ होत आहे आणि त्या प्रमाणात पदवीधर बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होत नाही. अद्यावत तंत्रज्ञान इत्यादींमुळे रोजगाराच्या संधी कमी होत आहेत. त्यामुळे त्यांचे मानसिक स्वास्थ बिघडत आहे. वैवाहिक जीवनामध्येही त्यांच्या अडचणी येत आहेत. अशा परिस्थितीमध्ये पदवीधर बेरोजगारांना शासनाने आर्थिक मदत करण्याची आवश्यकता आहे.

त्यासाठी राज्यातील पदवीधर बेरोजगार हा कमीत कमी १५ वर्षे राज्यात राहणारा असावा आणि त्यास २५ वर्षापर्यंत किंवा जास्तीत जास्त ५ वर्षापर्यंत रु. ५,०००/- दरमहा बेरोजगार भत्ता देण्याच्या दृष्टीने शासनाने उपाययोजना करावी.

वर नमूद केलेले उद्दीष्ट साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

विधान भवन,
नागपूर,
दिनांक : ५ डिसेंबर,२०२५.

**डॉ. राहुल वेदप्रकाश पाटील,**
प्रभारी सदस्य.

## वित्तीय ज्ञापन

विधेयकातील कलम ३ अन्वये महाराष्ट्र राज्यातील पदवीधर बेरोजगारांना दरमहा रुपये ५,०००/- इतका भत्ता राज्य शासनाने देण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यासाठी राज्यातील पदवीधर बेरोजगारांच्या एकूण संख्येनुसार राज्याच्या एकत्रित निधीमधून करावयाच्या आवर्ती खर्चाचा अंतर्भाव आहे. तथापि, याबाबत कराव्या लागणाऱ्या प्रत्यक्ष आवर्ती खर्चाचा अंदाज देणे या टप्प्यावर शक्य नाही.

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : १२ डिसेंबर,२०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.